संपत्तीत अल्लाहचा वाटा

लेखक

सय्यद जलालुद्दीन उमरी

भाषांतर

प्रा. मुबारक हुसैन मनियार

।। अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व कृपावंत आहे ।।

संपत्ती महान अल्लाहची फार मोठी देणगी आहे. यावर प्रत्येक माणसाला त्याचेच ऋणी राहिले पाहिजे. परंतु माणसाचा नीचपणा असा आहे की त्याला तो आपल्या शिक्षण, शक्ती व योग्यतेचे फळ मानतो आणि अल्लाहचे उपकार विसरून जातो. वस्तुस्थिती अशी आहे की माणसाला विवेक व कृतीच्या ज्या योग्यता प्राप्त झाल्या आहेत व धावपळीच्या ज्या संधी व सवलती प्राप्त आहेत, त्या सर्व अल्लाहनेच प्रदान केल्या आहेत. त्याचे सहाय्य व कृपा कार्यसिद्धीत नसेल तर तो कोणतीही गोष्ट आपल्या बाहुबलावर प्राप्त करू शकत नाही. पवित्र कुरआनने त्याच्या कृतघ्नतेचे वर्णन एके ठिकाणी अशा प्रकारे केले आहे,

"जेव्हा माणसाला त्रास होतो तेव्हा तो आमचा धावा करतो. मग जेव्हा आम्ही त्याला आमच्याकडून देणगी प्रदान करतो, तेव्हा तो म्हणतो की ही तर माझ्या (स्वत:च्या) ज्ञान व योग्यतेमुळे प्राप्त झाली आहे. वस्तुस्थिती अशी आहे की यात त्याची कसोटी व परीक्षा आहे. पण त्यांच्यापैकी बहुतेक जण हे जाणत नाहीत." (पवित्र कुरआन-सुरतुज्जुमर-४९)

पवित्र कुरआनने या विचारसरणीवर कठोर टीका केली आणि म्हटले की ज्या लोकांना अल्लाहने संपत्ती देऊन उपकृत केले आहे त्यांनी कृतघ्नतेचा व्यवहार सोडून द्यावा आणि त्याचे कृतज्ञ बनावे. अल्लाहने देणग्या दिल्या हे मान्य करणे म्हणजे सत्याचा स्वीकार करणे होय आणि जे लोक सत्याला खोटे ठरवितात ते दुसऱ्या कुणाची नव्हे तर स्वत:चीच हानी करून घेतात. त्याने मक्केतील अनेकेश्वरवाद्यांना सांगितले की काबागृहामुळे अरबस्तानच्या मरुभूमीत त्यांना जो व्यापारिक व आर्थिक लाभ झाला आहे त्याकरिता त्यांनी अल्लाहसमोर प्रार्थनेत नतमस्तक झाले पाहिजे व कृतज्ञतेने डोके टेकले पाहिजे, परंतु त्यांच्यापैकी बहुतेकजण या शिकवणीपासून वंचित आहेत.

"शांतीपूर्ण काबागृहाला आम्ही त्यांच्या निवासाचे स्थान बनविले जेथे सर्व बाजूंनी आमच्याकडून 'रोजी' म्हणून फळे विपुल प्रमाणात येतात. परंतु यांच्यापैकी बहुतेकजण जाणत नाहीत, हे सत्य नाही काय?" (पवित्र कुरआन-सूरतुल क़सस-५७)

एका अन्य प्रसंगी म्हटले,

"कुरैशांना सवय झाल्यावर म्हणजे त्यांना थंडी-उष्णतेत (व्यापारिक) प्रवासाची सवय झाल्यामुळे त्यांना या घराच्या (काबागृह) स्वामीची आराधना केली पाहिजे, ज्याने त्यांचे भुकेपासून रक्षण केले आणि भोजन दिले व (शत्रूंच्या) भयापासून सुरक्षित ठेवले."

(पवित्र कुरआन- सूरत कुरैश)

मक्केत मुस्लिम भय व असमाधानाचे जीवन जगत होते आणि आर्थिकदृष्ट्या त्रस्त झाले होते. मदीना मुनव्वरा येथे मात्र त्यांना सुख समाधान प्राप्त झाले होते तेव्हा पवित्र कुरआनने या उपकाराचे वर्णन केले आणि अल्लाहच्या आभारप्रदर्शनाची मागणी केली आहे-

"ती वेळ आठवा जेव्हा तुम्ही अल्पसंख्य होता. पृथ्वीवर निर्बल मानले जात होता. ीत राहत होता की एखादे वेळी लोकांनी तुम्हाला नामशेष करू नये. मग अल्लाहने तुमच्यासाठी एक ठिकाण उपलब्ध करून दिले, आपल्या सहाय्याने तुम्हाला शक्ती प्रदान केली आणि खाण्यासाठी स्वच्छ व शुचिर्भूत वस्तू दिल्या जेणेकरून तुम्ही त्याचे आभार

मानावेत.'' (पवित्र कुरआन- सुरतुल अनफ़ाल-२६)

कृतज्ञता व्यक्त केल्याने देणग्यांत वृद्धी होते व कृतघ्नता त्याच्या ऱ्हासास कारणीभूत होते. संपत्तीबद्दल कृतज्ञता दोन प्रकारे व्यक्त होते. एक असे की माणसाने हे सत्य मान्य करावे की त्याला जे काही प्राप्त झाले आहे ते अल्लाहकडून प्राप्त झाले आहे आणि मग संपूर्ण जीवनभर उपकाराच्या जाणीवेचा व्यवहार अंगीकारावा. हाच त्याच्यासाठी योग्यतम व्यवहार होय आणि याच्यातच त्याचे यश आहे. ते सोडून मनुष्य जेव्हा विद्रोह व अवज्ञेचा मार्ग अवलंबितो तेव्हा जणू स्वत:साठी त्या दुष्परिणामाला पसंत केले आहे, जो या भूतलावर नेहमी अल्लाहशी विद्रोह करणाऱ्यांचा होत राहिला आहे.

संपत्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची दुसरी रीत अशी आहे की त्यात मनुष्याने अल्लाहच्या सेवकांचा हक्क मान्य करावा व तो देण्याचा प्रयत्न करावा. अशा प्रकारे हक्क देऊन तो स्वत:चे केवळ नैतिक व कायदेशीर कर्तव्य पार पाडतो असे नव्हे, तर आपल्या धन व संपत्तीला विनाशापासून वाचवितो आणि त्याच्या प्रगतीची तरतूद करतो. जेव्हा जेव्हा माणसाने हा हक्क देण्यात निष्काळजीपणा व कोतेपणा दाखविला, तेव्हा त्याच्या प्रगतीला धोका निर्माण झाला व त्याला आपल्या संपत्तीचे व भांडवलाचे रक्षण करणेसुद्धा दुरापास्त झाले.

मनुष्य ज्या समाजात राहतो आणि ज्याच्या माध्यम व साधनांचा लाभ घेऊन तो प्रगती करतो, जर त्याचे हक्क ओळखले नाही तर लवकरच त्याच्या सहकार्य व सहानुभूतीपासून तो वंचित होतो. माणसाच्या आर्थिक प्रगतीत त्याच्या प्रयत्न, युक्ती व परिश्रमासह दुसऱ्यांच्या प्रयत्नांचासुद्धा वाटा आहे. जर त्याने या सत्याचे विस्मरण केले आणि ज्या लोकांच्या सहाय्य व सहकार्यामुळे तो वर आला आहे, त्यांच्या मौलिक गरजा आणि योग्य मागण्यासुद्धा ठोकरून पुढे जाण्याचे ठरविले, तर त्यांच्यात त्याच्याविरूद्ध दु:ख, राग व तिरस्काराच्या भावना भडकणे अगदी स्वाभाविक आहे. मग एक वेळ अशी येते, जेव्हा ज्यांनी त्याला पुढे केले होते, तेच लोक त्याला पाठीमागे ढकलून देऊ इच्छितात. जेथे त्याचे श्रद्धापूर्वक व प्रेमाने स्वागत होत होते, तेथे प्रत्येक मनुष्य त्याला तिरस्कार व तुच्छतेने पाहू लागतो. शेवटी हीच गोष्ट त्याच्या ऱ्हास व विनाशाचे कारण बनते व तो जितका उंच केला होता तितकाच तो खाली उतरतो.

याचबरोबर हेदेखील एक सत्य आहे की स्वार्थीपणा व संधीसाधूपणाचे वर्तन माणसाला अल्लाहच्या कृपा, प्रेम व देणग्यांपासून वंचित ठेवते. जो मनुष्य आपल्या हाताखालचे लोक, निर्बल व मोतादांकडे दुर्लक्ष करून विलासात राहतो, तो अतिशीघ्र अल्लाहच्या प्रकोपाचा लक्ष्य बनतो आणि जी धन-संपत्ती प्राप्त करून तो अल्लाह व त्याच्या सेवकांचे हक्क विसरून गेला होता, ती बहुधा त्याच्याकडून हिरावून घेतली जाते. पवित्र कुरआनात ही गोष्ट अनेक उदाहरणे देऊन समजाविली आहे.

बनी इस्राईल एक गरीब, दुरवस्था असलेला, पीडित व शासित लोकसमूह होता. याच लोकसमूहात 'कारून'सुद्धा होता, ज्याच्या खजिन्याच्या किल्ल्या अनेकांनी उचलल्या तरी उचलत नसत. अशा अगण्य संपत्ती प्राप्त करून अल्लाहचा ऋणी झाला असता आणि माणसांचे हक्क ओळखले असते, पण त्याने जुलूम व अत्याचाराची नीती अवलंबिली आणि संपत्तीच्या गर्वाने दुसऱ्यांना त्याच्या दृष्टीत तुच्छ व अपमानित बनविले. यासाठी

उपदेशकांनी त्याला उपदेश दिला,

"गर्व करू नका, अशासाठी की अल्लाह गर्विष्ठांना पसंत करीत नाही. जे काही अल्लाहने तुम्हाला दिले आहे त्यापासून परलोक व्यवस्था करा, जगात जो तुमचा वाटा आहे त्यांला विसरू नका आणि लोकांवर तसेच उपकार करा जसे अल्लाहने तुमच्यावर केले आहेत आणि देशात उपद्रवाची इच्छा करू नका. नि:संशय अल्लाह उपद्रव माजविणाऱ्यांना पसंत करीत नाही." (पवित्र कुरआन- सूरतुल क़सस-७७)

कारूनने या मौल्यवान उपदेशाला ठोकरले. तो म्हणाला,

"हे सर्व काही तर मला (माझ्या) ज्ञानामुळे प्राप्त झाले आहे."

(पवित्र कुरआन- सूरतुल क़सस-७८)

अर्थ असा की ही धन-दौलत कुणी मला दान म्हणून दिलेली नाही, तर ही संपत्ती माझ्या वैयक्तिक प्रयत्न व योग्यतेचे फळ होय. म्हणून यात कोणीही आपल्या हक्काचा दावाही करू शकत नाही की कोणाची सेवादेखील माझ्यावर अनिवार्य नाही. वस्तुत: हीच ती विचारसरणी व स्वभाव आहे, जे माणसाच्या विनाशाचे कारण बनते. पवित्र कुरआनने म्हटले आहे,

"महान अल्लाहने यापूर्वी त्या अनेक जातींना नष्ट केले आहे, ज्या यापेक्षा अधिक शक्तिमान होत्या आणि ज्यांच्याजवळ यापेक्षा अधिक संपत्ती होती. अपराध्यांना त्याच्या गुन्ह्यासंबंधी विचारले जात नाही, हे त्याला कळत नाही काय?"

(पवित्र कुरआन- सूरतुल क़सस-७८)

याचा अर्थ असा की, कारून संपत्तीत मदनमस्त होता. त्याने या सत्याकडे डोळेझाक केली होती की, जगात त्याच्यापेक्षा अधिक शक्तिमान व धन-दौलतवाले जन्मले. परंतु जेव्हा त्यांनी अल्लाह व सेवकांचे हक्क ओळखले नाही, तेव्हा निसर्गाच्या कायद्याने त्यांच्याशी दयेचा व्यवहार केला नाही आणि ते नष्ट केले गेले.

कारूनच्या वैभवाची स्थिती अशी होती की, बरेचसे अज्ञानी लोक तीव्र इच्छेने त्याला पाहत असत आणि त्याच्या भाग्याचा हेवा करीत असत. परंतु ज्यांना दूरदृष्टी होती, त्यांना माहीत होते की ज्या माणसाने अल्लाहचे विस्मरण केले आहे व सेवकांचे हक्क पायाखाली तुडविले आहेत, त्याचा ऱ्हास सुनिश्चित आहे आणि त्याला कोणतीही गोष्ट विनाशापासून वाचवू शकत नाही. म्हणून असेच घडले की कारून आणि त्याच्या राजप्रासादाला जमिनीत गाडले गेले. त्याला कोठेही आश्रय मिळाला नाही आणि तो स्वत:लादेखील वाचवू शकला नाही. अशा प्रकारे त्याचे सारे वैभव जगासाठी एक धडा बनलेला आहे आणि त्याच्या अंतिमसमयी दोन अश्रू गाळणारादेखील कोणी उरला नाही.

(पवित्र कुरआन- सूरतुल क़सस-रुकूअ ८)

'सूरतुल कहफ़'मध्ये दोन माणसांचे उदाहरण दिले गेले आहे. एकाजवळ द्राक्षाच्या उत्तम दोन बागा होत्या. या बागांच्या चारी बाजूला खजुरीची झाडे होती. शेतीवाडी होती. जलसिंचनासाठी कालवा होता. त्यामुळे उत्पन्न चांगले निघत होते आणि त्याच्या सुस्थितीत प्रगती होत होती. परंतु धन-दौलतीने त्याच्यात कृतज्ञतेच्या भावनेऐवजी गर्व व अहंकार निर्माण केले. त्याने आपल्या मित्राला तुच्छतेच्या स्वरात सांगितले,

"माझ्याजवळ तुझ्यापेक्षा अधिक संपत्ती आहे आणि तुझ्यापेक्षा अधिक शक्तिमान

लोक माझ्यापाशी आहेत." (पवित्र कुरआन- सूरतुल कहफ़-३६)

धन-दौलत प्राप्त झाल्यानंतर ज्याप्रमाणे एक संसारी मनुष्य असे समजतो की त्याचे सुख चैन व आराम चिरस्थायी आहे. अशाच प्रकारे त्यालासुद्धा असे वाटले की त्याला कायमस्वरूपी ऐश्वर्य प्राप्त झाले आहे आणि त्याची सुस्थिती कदापि संपुष्टात येणार नाही. जेव्हा त्याला सांगितले गेले की हे जगच सर्वकाही नव्हे. हे तर नश्वर जग आहे. याच्यानंतर अंतिम दिनसुद्धा आहे. जेथे त्याला आपल्या कृत्यांचा हिशेब द्यावा लागेल. तेव्हा तो म्हणाला, 'अंतिम दिनाची कल्पना मी मान्य करण्यासारखी नाही. मी ती मानीत नाही. जरी अंतिम दिन आला तरी माझा शेवट चांगलाच होईल. जो आज सुदैवी आहे, तो उद्या दुर्दैवी होऊ शकत नाही.' त्याच्या मित्राने त्याला समजाविले की, तुम्ही अल्लाहचा इन्कार कोणत्याही प्रकारे करू शकत नाही, ते अशासाठी की तुमच्या स्वत:चे अस्तित्वच त्याची ग्वाही देत आहे. त्याने तुम्हाला अभावातून काढले व मनुष्य बनविले. तुम्हाला जे धन मिळाले आहे हेदेखील त्याच्याकडूनच मिळाले आहे. त्यासाठी तुम्हाला त्याचा कृतज्ञ बनले पाहिजे. परंतु त्याने हा मार्ग अवलंबिला नाही. अंतत: त्याचा शेवट तसाच झाला, जसा कृतघ्न लोक आणि राष्ट्रांचा होतो. पवित्र कुरआनने त्याच्या विनाशाचे चित्र असे रेखाटले आहे-

"त्याचे संपूर्ण पीक नष्ट झाले आणि आपले उपवन पालथे पडलेले पाहून त्याने त्यावर जो खर्च केला होता, त्यावर पश्चात्ताप करू लागला आणि म्हणू लागला, 'अरेरे! मी जर अल्लाहबरोबर कुणाला भागीदार ठरविले नसते तर किती चांगले झाले असते!"

त्याचा कोणताही समूह असा नव्हता ज्याने त्याला सहाय्य केले असते आणि त्याच्या स्वत:मध्येदेखील सूड उगविण्याची शक्ती नव्हती. त्या वेळी कळले की सर्व सत्ता अल्लाहच्या हातात आहे, त्याच्याजवळच अधिक चांगला मोबदला आहे आणि तोच चांगल्या अंतापर्यंत पोचवितो.

'सूरह क़लम'मध्ये अशाच प्रकारची आणखी एक घटना वर्णिली आहे. ही घटना काही मळेवाल्यांची आहे. जेव्हा त्यांच्या मळ्याचे पीक तयार झाले, तेव्हा त्यांनी असा निर्णय घेतला की भल्या पहाटे आणि लोकांच्या उठण्यापूर्वीच पीक कापून घेऊ म्हणजे एखाद्या मोताद याचकाला बातमी लागून त्याने आपली मोकळी झोळी घेऊन मागण्यास येऊ नये. महान अल्लाहला त्यांची ही पाषाणहृदयता व निर्दयता इतकी नावडली की रात्रीच्या रात्रीत त्यांचे सारे पीक नष्ट झाले आणि ते पश्चात्ताप करीत राहिले. ते गरिबांचा हक्क मारू इच्छित होते की ते स्वत:च्या हक्कापासूनसुद्धा वंचित झाले. परंतु त्यांची सद्सद्विवेकबुद्धी अद्याप नष्ट झाली नव्हती. त्यांच्यात माणुसकी, प्रेम व सहानुभूती अद्याप जिवंत होती. म्हणून त्यांच्यापैकीच एका पुण्यशील व सदाचारी माणसाने त्यांच्या या चुकीच्या व्यवहाराकडे त्यांचे लक्ष वेधले आणि ते अल्लाहकडे क्षमायाचना करू लागले. या घटनेच्या वर्णनानंतर पवित्र कुरआनने म्हटले आहे,

"असा आहे प्रकोप आणि अंतिम दिनाचा प्रकोप तर फार मोठा आहे. किती बरे झाले असते, जर यांना ही गोष्ट कळली असती!" (पवित्र कुरआन- सूरतुल क़लम-३३)

हदीसमध्येसुद्धा स्पष्टपणे सांगितले गेले आहे की कृपाप्रसाद प्राप्त झाल्यानंतर त्याचे आभार मानणे आवश्यक ठरते. आभार व्यक्त केले नाही तर देणगी हिसकावून घेतली जाते.

महान अल्लाह जेव्हा एखाद्याला संपत्ती प्रदान करतो, तेव्हा त्यात असंख्य लोकांचे हक्क ठेवतो. मग तो हे पाहतो की हे हक्क अदा केले जातात की नाही? जर माणसाने आनंदी मनाने हे हक्क अदा केले तर संपत्ती टिकून राहते आणि वाढसुद्धा होते. जेव्हा तो हे हक्क देण्यात कुचराई करू लागतो, तेव्हा संपत्तीला कीड लागते आणि ती काही वेळात संपून जाते. माननीय अब्दुल्ला बिन अब्बास (रजि.) निवेदन करतात की आदरणीय मुहम्मद (स.) यांनी फर्माविले,

"ज्या सेवकाला महान अल्लाह पूर्णपणे देणग्यांनी उपकृत करतो व मग लोकांच्या गरजा त्यांच्याशी संलग्न करतो (तेव्हा त्याने या गरजा अवश्य पुऱ्या केल्या पाहिजेत.) जर त्याच्यात त्याच्यापासून त्रस्तता आणि संकुचितपणा आला तर अल्लाह आपल्या देणग्यांचा ऱ्हास करतो."

(कालल मुन्जरी, खाह अलतिबरानी बिअसनादि जय्यद, अत्तरगीब वत्तरही, पृ. ४८२)

माननीय अब्दुल्ला बिन उमर (रजि.) यांचे कथन आहे की, आदरणीय मुहम्मद (स.) यांनी फर्मावले,

"महान अल्लाह विशेषत: काही जातींना देणग्या प्रदान करतो, जेणेकरून सेवकांना लाभ पोचावा. या देणग्या आणि सुख-समाधानात तो त्यांना त्यावेळपर्यंत ठेवतो, जोपर्यंत ते अल्लाहच्या सेवकांवर त्याच्या या देणग्या खर्च करतात. जेव्हा ते त्याकडून हात आखडते घेतात, तेव्हा त्या देणग्या तो दुसऱ्यांकडे वळवितो."

(काललमुन्जरी, खाह इब्न अबिहुनिया वलतिबरानी फिलकबीरि वल अवसति वली क़ीला बितहसीनि सनदुहु लिकाना मुमकिना. तर्गीब, पृष्ठ ४८२)

हदीसमध्ये घटनांच्या सहाय्यानेसुद्धा ही गोष्ट समजावून देण्याचा प्रयत्न केला गेला आहे की, संपत्तीबद्दल आभार मानणे आवश्यक आहे. कृतज्ञतेने देणग्यांत वृद्धी होते आणि कृतघ्नता देणग्यांच्या ऱ्हासास कारणीभूत ठरते.

एका हदीसमध्ये आहे की, आदरणीय मुहम्मद (स.) यांनी सांगितले की बनी इस्राईलमध्ये तीन लाचार लोक होते. एक श्वेतकुष्ठ रोगी, दुसरा डोक्यावर टक्कल पडलेला आणि तिसरा आंधळा. महान अल्लाहने त्यांना संकटानंतर सुख देऊन अजमावण्याचे ठरविले. म्हणून त्यांच्याकडे एक फरिश्ता (देवदूत) पाठविला.

फरिश्ता सर्वप्रथम श्वेतकुष्ठ रोग्याकडे गेला आणि विचारले, "तुला सर्वांत जास्त कोणती गोष्ट पसंत आहे?" त्याने उत्तर दिले, "हा रोग ज्याच्यामुळे लोक माझा तिरस्कार व घृणा करतात, नष्ट व्हावा, शरीरावरील डाग नाहीसे व्हावे आणि चांगला रंग मिळावा." फरिश्ताने त्याच्या शरीरावर हात फिरविला, तेव्हा त्याचा रोग नाहीसा झाला आणि त्याला सुस्वरूप प्राप्त झाले. त्यानंतर फरिश्त्याने त्याला विचारले, "तुला कोणत्या प्रकारचे धन सर्वांत अधिक प्रिय आहे?" त्याने उंठ अथवा गायीचे नाव घेतले आणि त्याला गाभण सांडणी अथवा गाभण गाय, जी त्याने इच्छिली होती त्याला मिळाली. फरिश्त्याने प्रार्थना केली, "महान अल्लाहने तुझ्या धनात वाढ करावी" आणि तो निघून गेला.

मग तो डोक्यावर टक्कल पडलेल्या माणसाकडे गेला आणि त्याला आवडणाऱ्या वस्तुविषयी चौकशी केली. तो म्हणाला, "माझी सर्वांत मोठी इच्छा अशी आहे की हे टक्कल दूर व्हावे आणि चांगले केस मिळावेत." फरिश्त्याने त्याच्या डोक्यावर हात

फिरविला, तेव्हा त्याचे टक्कल नाहीसे झाले आणि सुंदर केस उगवले. फरिश्त्याने त्याला विचारले, तुला कोणत्या प्रकारचे धन हवे? तेव्हा त्याने गाय किंवा उंटाची निवड केली आणि ती त्याला प्राप्त झाली. फरिश्त्याने भरभराटीबद्दल प्रार्थना केली आणि निघून गेला.

त्यानंतर तो आंधळ्याजवळ आला आणि त्याची सर्वांत मोठी इच्छा विचारली. त्याने उत्तर दिले, "माझी सर्वांत मोठी इच्छा आहे की, महान अल्लाहने मला पुन्हा दृष्टी प्रदान करावी आणि मी पुन्हा जग पाहू शकावे." फरिश्त्याने त्या आंधळ्या माणसाच्या चेहऱ्यावर हात फिरविला, तेव्हा त्याला दृष्टी मिळाली आणि तो पाहू लागला. फरिश्त्याने त्यालासुद्धा विचारले, "तुला कोणत्या प्रकारचे धन हवे?" त्याने शेळीची निवड केली. म्हणून त्याला एक गाभण शेळी मिळाली. फरिश्त्याने त्याच्यासाठीसुद्धा मांगल्या व भरभराटीची प्रार्थना केली व निघून गेला.

दीर्घ काळ लोटला व त्या जनावरांचा वंश खूप वाढला. त्या तिघांपैकी एक उंटांच्या कळपाचा, दुसरा गायींच्या व तिसरा शेळ्यांच्या कळपाचा मालक झाला.

महान अल्लाहने त्यांच्या या धनाची परीक्षा घ्यावयाचे ठरविले. म्हणून तोच फरिश्ता दुसऱ्यांदा एका प्रवाशाच्या रूपात पूर्वीच्या श्वेतकुष्ठ रोग्यापाशी पोचला आणि म्हणाला, "मी एक गरीब व गरजू मनुष्य आहे. प्रवासातील अडचणींनी घेरला गेलो आहे. सर्व साधने व माध्यमे संपलेली आहेत. आता अल्लाहचे सहाय्य आणि तुमच्या मदतीनेच गंतव्य स्थानापर्यंत पोचू शकेन. त्या अल्लाहच्या नावाने तुमच्यापाशी एक उंट मागतो, ज्याने तुम्हाला आरोग्य व स्वास्थ्य प्रदान केले व ही संपत्ती दिली." त्याने उत्तर दिले, "अनेक हक्क व जबाबदाऱ्या आहेत, ज्या मला पार पाडावयाच्या आहेत. म्हणून मी तुम्हाला कसलेही सहाय्य करू शकत नाही." फरिश्त्याने त्याला सांगितले, "मला आठवते मी तुम्हाला यापूर्वीही पाहिले आहे. असे तर नाही ना की तुम्ही श्वेतकुष्ठ रोगाने पछाडलेला होता? अल्लाहने तुम्हाला त्यापासून आरोग्य प्रदान केले आणि तुम्ही भिकारी होता, अल्लाहने तुम्हाला ही संपत्ती दिली? जर हे सत्य असेल तर तुम्ही त्याच्यासमोर कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे." त्याने उत्तर दिले, "तुमचे म्हणणे चुकीचे आहे. ही संपत्ती मला माझ्या वाडवडिलांकडून मिळाली आहे." फरिश्त्याने शाप दिला, "जर तुम्ही खोटे बोलत असाल तर अल्लाहने तुम्हाला त्याच पूर्वस्थितीत पोचवावे, ज्यात तुम्ही होता."

मग तो त्या टक्कल पडलेल्या माणसाकडे गेला आणि त्याच्याकडेसुद्धा अशीच याचना केली. त्याचे उत्तरसुद्धा श्वेतकुष्ठ रोग्यापेक्षा वेगळे नव्हते. फरिश्त्याने त्यालाही शाप दिला आणि निघून गेला.

शेवटी तो आंधळ्याकडे गेला. जेव्हा त्याला त्याच्या पूवस्थितीची आठवण करून दिली तेव्हा त्याने मान्य केले की होय, मी आंधळा होतो. अल्लाहने मला दृष्टी दिली व मालमत्ता प्रदान केली. शेळ्यांचा हा कळप आहे. तुम्हाला जितक्या शेळ्यांची गरज असेल तितक्या शेळ्या या कळपातून घ्या. माझ्याकडून पूर्ण परवानगी आहे. फरिश्ता म्हणाला, "मला तुमच्या धनाची गरज नाही. खरे पाहता अल्लाहने अशा तऱ्हेने आजमाविले होते. तुम्ही तर या परीक्षेत पास झाला आणि तुमचे दोन्ही मित्र नापास झाले. महान अल्लाह तुमच्या व्यवहाराने प्रसन्न झाला व त्यांच्यावर अप्रसन्न."

(मिश्कात किताबुज्जकात, बाबुलअनफ़ाक़ व कराहतियल अमसाक बुखारी

व मुस्लिमचे प्रमाण)

आणखी एक हदीस (प्रेषित मुहम्मद स. यांचे वचन) आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी फर्मािवले,

"एक मनुष्य मैदानातून जात होता. त्याने अपरोक्षातून आवाज ऐकला की वर मेघाला आदेश दिला जात होता की अमुक माणसाच्या बागेत सिंचन कर. म्हणून मेघ एका विशिष्ट दिशेने वाटचाल करू लागला आणि एका खडकाळ जमिनीवर वर्षाव केला. मग एक लहानसा प्रवाह बनून पाणी वाहू लागले. हा मनुष्य जो या आश्चर्यजनक घटनेचे निरीक्षण करीत होता, तो त्या प्रवाहाबरोबर चालू लागला. त्याने पाहिले की प्रवाह एका बागेत जात आहे आणि तेथे एक मनुष्य आपल्या बागेला पाणी देत आहे. त्याने त्याचे नाव विचारले, तेव्हा बागेच्या मालकाने तेच नाव सांगितले जे त्याने अपरोक्ष आवाजात ऐकले होते. बागेच्या मालकाने विचारले, "हे अल्लाहच्या सेवका, मला सांग की तू माझे नाव का विचारले?" त्याने संपूर्ण घटना त्याला ऐकविली आणि विचारणा केली, "तो आपल्या बागेत कोणत्या गोष्टीकडे लक्ष देतो की ज्यामुळे अल्लाहने विशेषकरून तुझ्या बागेत वर्षाव करण्याची मेघाला आज्ञा दिली. त्याने उत्तर दिले, "या बागेत जे उत्पन्न निघते मी त्याचे तीन भाग करतो. एक भाग अल्लाहच्या मार्गात खर्च करतो. दुसऱ्याने आपल्या व आपल्या मुलाबाळांच्या गरजा भागवितो. तिसरा भाग स्वत: त्या बागेच्या देखरेखीसाठी खर्च करतो."

(मिश्कात प्रमाण पूर्वीचा मुस्लिम)

अशा तऱ्हेच्या घटनांच्या बाबतीत एक प्रश्न उत्पन्न होतो की त्यांची काही ऐतिहासिकता आहे की केवळ उदाहरणे होत? परंतु हा प्रश्न विशेष महत्त्वाचा नाही. खरे महत्त्व त्या गोष्टीचे आहे, जी त्यात सांगितली गेली आहे. साध्या शब्दांत ती गोष्ट अशी आहे की ज्या माणसाला महान अल्लाहने धनदौलत प्रदान केली आहे, त्यासाठी कृतज्ञता व्यक्त करणे हे कर्तव्य ठरते. निस्संदेह कृतज्ञता अशीसुद्धा आहे की माणसाने आपल्या तोंडाने अल्लाहच्या देणग्या व त्याच्या मेहरबानी व उपकाराची कबुली द्यावी. परंतु याच्यापेक्षा मोठी आणि खरी कृतज्ञता अशी आहे की संपत्ती अल्लाहच्या इच्छेप्रमाणे उपयोगात आणावी आणि त्यात सेवकांचे जे हक्क आहेत ते दिले जावेत.

व्यक्तीप्रमाणेच जेव्हा राष्ट्रसुद्धा कृतघ्नतेची पद्धत अवलंबितात, तेव्हा तो नष्ट भ्रष्ट होतात. त्यांचे वैभव व शक्ती आणि सत्ता धुळीस मिळतो. पवित्र कुरआनवरून कळते की, जेव्हा एखादे राष्ट्र अल्लाहच्या देणग्या प्राप्त झाल्यानंतर त्या विसरते आणि त्याची ही सद्सद्विवेकबुद्धी नष्ट होते की ज्या अल्लाहने त्याच्यावर कृपा केली आहे, त्याच्याशी कृतज्ञ राहिले पाहिजे, तेव्हा ते अल्लाहच्या आज्ञापालनाकडून तोंड फिरवते आणि त्याच्या प्रकोप व पकडीपासून निर्भय होऊन जीवन जगू लागते. त्या राष्ट्राच्या हातून अल्लाहच्या हक्काबरोबरच त्याच्या सेवकांच्या हक्कांचीसुद्धा पायमल्ली होते.

अल्लाहची अवज्ञा आणि सेवकांचे हक्क न देण्यात फार जवळचा संबंध आहे. जे राष्ट्र अल्लाहशी निर्भय असेल, त्याला त्याच्या सेवकांशी कसलीही सहानुभूती नसते. जेव्हा अल्लाहचे हक्क नष्ट करण्याचे धाडस त्याच्यात निर्माण होते, तेव्हा त्याला सेवकांच्या हक्कांची पायमल्ली करण्यातसुद्धा कोणतीही लज्जा उरत नाही. अल्लाहला विसरल्यानंतर सेवकांचे विस्मरण करणे सोपे असते. अल्लाहला दिसणाऱ्या व अल्लाहकडून निराश

झालेल्या राष्ट्राकडून ही अपेक्षा करणे शक्य नाही की ते राष्ट्र जनतेशी न्याय, प्रेम व सहानुभूती, सद्व्यवहार आणि उपकाराचा श्रेष्ठ व सज्जनतापूर्ण व्यवहार करील. इतिहास दर्शवितो की जेव्हा जेव्हा एखाद्या राष्ट्राने अल्लाहशी विद्रोह केला, तर त्यात स्वार्थ व जुलूम-जबरदस्तीचा प्रादुर्भाव झाला. त्यातील शक्तिमान लोक दुर्बलांना लुटू लागले. त्यातील श्रीमंतांनी आपल्या धनदौलतीत अल्लाहच्या कोणत्याही सेवकाचा हक्क मानण्यास नकार दिला आणि त्यातील सुखवस्तु लोकांनी आपल्या सुख व ऐश्वर्यात कोणालाही सामील करणे पसंत केले नाही. हीच गोष्ट अंततः त्यांच्या विध्वंस व विनाशाला कारणीभूत झाली.

पवित्र कुरआनने पुन्हा पुन्हा म्हटले आहे की ज्या समुहांना जगातील सुख-समृद्धी प्राप्त झाली आणि त्यांना वरचेवर स्मरण करून दिले असता व धमकावले असतादेखील त्यांनी कृतघ्नतेचा शिरस्ता सोडून दिला नाही व चैनीत आणि ऐश्वर्यात निमग्न होऊन अल्लाहीच अवज्ञा व विद्रोहावर ते अडून राहिले, तेव्हा त्यांचे ऐश्वर्य व सुख त्यांच्याकडून हिरावून घेतले गेले आणि तो लोकसमूह व राष्ट्र नष्ट केले गेले. म्हणून एके ठिकाणी अल्लाहच्या कृपाप्रसादाचा इन्कार करण्याच्या भयंकर फळापासून सावध केल्यानंतर अल्लाहलाच आपला उपकारकर्ता व स्वामी मानणे आणि कृतज्ञतेची रीत अवलंबिण्याचे आदेश दिले गेले आहेत. फर्माविले आहे,

''महान अल्लाहने एका वस्तीचे उदाहरण दिले जी आपल्या ठिकाणी सुखशांतीने होती. सर्व बाजूंनी तिच्याजवळ मुबलक रोजी येत होती. परंतु जेव्हा तिने अल्लाहच्या उपकाराबद्दल कृतघ्नता दर्शविली तेव्हा त्याने गरिबी व उपासमारी आणि भय व दहशतीचा पोषाख तिला घातला. या कृत्यामुळे की जी ते करीत होते, त्याच्याकडे त्यांच्यापैकीच एक प्रेषित आला. परंतु त्यांनी त्याला खोटे ठरविले. मग त्यांना प्रकोपाने पकडले. अशासाठी की ते जुलमी होते. म्हणून तुम्ही कमवा जे काही धर्मसंमत व शुद्ध, अल्लाहने तुम्हाला दिले आहे. अल्लाहसमोर त्याच्या उपकाराबद्दल कृतज्ञता व्यक्त करा व जर तुम्ही त्याचीच उपासना करीत असाल.'' (पवित्र कुरआन - सूरतुलन्नहल - ११२,११४)

एका दुसऱ्या जागी म्हटले आहे,

''कित्येक अशा वस्त्या आम्ही उद्ध्वस्त करून टाकल्या आहेत, ज्यातील लोक आपल्या खुशालीवर गर्व करू लागले होते. ही त्यांची ठिकाणे होत जी त्यांच्यानंतर कमीच वसली आणि आम्हीच वारस बनून उरलो.'' (पवित्र कुरआन - सूरतुलकसस - ५८)

बनी इस्राईलवर महान अल्लाहने बरेचसे उपकार केले. त्यांना राज्य व अधिकार दिला, जगाचे नेतृत्व प्रदान केले. आधिभौतिक शक्तीने उपकृत केले. खाण्यापिण्यासाठी उत्तम पदार्थ दिले आणि सर्वांत मोठी गोष्ट अशी की त्यांच्यात पैगंबरी (प्रेषितत्वाचा) क्रम सुरू केला. पवित्र कुरआनने या उपकारांचे वर्णन अशा प्रकारे केले आहे-

''आम्ही बनी इस्राईलला ग्रंथ, राज्य व प्रेषितत्व प्रदान केले. खाण्यापिण्यासाठी पवित्र वस्तु आणि जगातील लोकांवर श्रेष्ठत्व प्रदान केले.''

(पवित्र कुरआन- सूरतुल जासिया - १६)

त्यांना सांगितले गेले की महान अल्लाहने तुम्हाला फिरऔनच्या जुलुम व अत्याचारातून वाचविले, तौरेतसारखे पवित्र ग्रंथ प्रदान केले आणि जलरहित हिरवळरहित सीनाच्या

वाळवंटात मन्न व सलवा (मधुर रस व बटेर पक्षी) उतरविले. अल्लाहच्या देणग्यांचा खूप लाभ घ्या. परंतु विद्रोह व उदंडपणा अवलंबू नका - नाहीतर अल्लाहचा प्रकोप उतरेल व तुम्हाला नष्ट केले जाईल.

"ज्या स्वच्छ वस्तु आम्ही तुम्हाला दिलेल्या आहेत, त्यातून खा आणि त्यात अतिरेक करू नका. नाहीतर तुमच्यावर माझा कोप कोसळेल आणि ज्यावर माझा कोप कोसळतो तो वरून खाली येतो." (पवित्र कुरआन - सूरतु ताहा - ८१)

परंतु बनी इस्राईलनी अल्लाहची अवज्ञा केली आणि पृथ्वीवर उपद्रव माजविला. याचा परिणाम असा झाला की त्यांची सत्ता त्यांच्यापासून हिरावून घेतली आणि त्यांचे शत्रू त्यांच्यावर प्रभावी ठरले. एका विशिष्ट मुदतीनंतर अल्लाहने त्यांच्यावर उपकार केले. न केवळ असे की त्यांना त्याच्या शत्रूवर प्रभावी ठरविले तर त्यांच्या संपत्ती व संततीमध्ये भरभराट प्रदान केली आणि त्यांच्या संपत्तीत वृद्धी केली. त्यांना उपदेश दिले गेले की त्यांनी कृतज्ञतेची नीती स्वीकारावी. अल्लाहने दिलेल्या देणग्यांबद्दल कृतघ्न बनू नका. यात कोणा दुसऱ्याचा नव्हे तर खुद्द त्यांचाच फायदा आहे.

"नंतर आम्ही स्थिती बदलली आणि तुम्हाला त्यांच्यावर प्रभावी बनविले आणि संपत्ती व संतती देऊन तुम्हाला सहाय्य केले व तुमची संख्या वाढविली. जर तुम्ही भलाई केली तर स्वत:साठी भलेपणा केला आणि वाईटपणा केला तर स्वत:साठी."

(पवित्र कुरआन- बनी इस्राईल : ६-७)

त्यांनी या उपदेशाचे विस्मरण करून टाकले आणि कृतघ्नता व अवज्ञेची चाल सोडली नाही. म्हणून त्यांचे शत्रू त्यांच्यावर दुसऱ्यांदा प्रभावी झाले. त्यांच्या पवित्र स्थळांना नष्ट भ्रष्ट करून टाकले आणि ते सर्व प्रकारे अपमानित व लज्जित झाले. यावर त्यांना सांगितले गेले,

"शक्य आहे की तुमच्या पालनकर्त्याने पुन्हा तुमच्यावर दया करावी. परंतु जर तुम्ही तसेच केले जसे पूर्वी केले होते तर आम्हीसुद्धा तेच करू जे यापूर्वी करून टाकले आहे."

(पवित्र कुरआन- बनी इस्राईल : ८)

हीच गोष्ट सूरत 'इब्राहीम'मध्ये अशाप्रकारे सांगितली आहे,

"आणि आठवा ती वेळ की जेव्हा तुमच्या पालनकर्त्याने अशी घोषणा केली की जर तुम्ही कृतज्ञता व्यक्त कराल तर मी अवश्य तुम्हाला यापेक्षा अधिक देईन. परंतु जर तुम्ही कृतघ्न बनाल तर लक्षात ठेवा की माझा प्रकोपदेखील फार भयंकर आहे."

(पवित्र कुरआन- सूरतु इब्राहीम : ७)

बनी इस्राईलने जेव्हा महान अल्लाहच्या प्रत्येक लहान-मोठ्या देणगीची अवहेलना केली आणि आपल्या वाचा व कृतीने सिद्ध केले की ते कृतज्ञ राष्ट्र बनण्यास अपात्र आहे. तेव्हा त्या सर्व देणग्या एक एक करून त्यांच्याकडून हिरावून घेतल्या गेल्या, ज्या अल्लाहने त्यांना प्रदान केल्या होत्या. वस्तुस्थिती अशी आहे की कोणतेही कृतघ्न राष्ट्र एखाद्या अन्य राष्ट्राचे नव्हे तर स्वत:चेच नुकसान करून घेते. म्हणूनच पवित्र कुरआनने म्हटले,

"त्यांनी आमची काही हानी केली नाही तर ते स्वत:वरच जुलुम करीत होते."

(पवित्र कुरआन- सुरतुल बक़रा : ५७)

याचे एक अन्य उदाहरण सबा राष्ट्राचे आहे. प्रेषित ईसा मसीह (येशू ख्रिस्त) यांच्या दोनशे वर्षांपूर्वी महान अल्लाहने त्या राष्ट्राला मोठे अधिभौतिक उत्कर्ष व खुशाली दिली होती. त्यांनी मोठे धरण बांधून अरबस्तानच्या वाळवंटाला हिरवेगार व प्रफुल्ल बनवून टाकले होते. त्यांच्या वस्त्यांच्या दोन्ही बाजूला लांब लांबपर्यंत आणि अखंडपणे हिरव्यागार बागा पसरलेल्या होत्या. त्याचबरोबर सीरियापर्यंत त्यांच्या व्यापाराचा क्रम सुरू होता. मार्गावरील वस्त्यांशी त्यांचे संबंध सलोख्याचे होते. म्हणून प्रवास बिनधोक होत असे आणि ते संपूर्ण समाधानाने व्यापारी लाभ प्राप्त करीत होते. परंतु या समृद्धी व खुशालीने त्यांना अल्लाहपासून बेपर्वा करून टाकले आणि ते हे विसरून गेले की त्या देणग्यांवर त्यांना अल्लाहच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे व त्याचे आज्ञाधारक बनून राहिले पाहिजे. उपदेशकांनी त्यांना उपदेश दिला,

"आपल्या पालनकर्त्याने दिलेली 'रोजी' खा आणि आपल्या पालनकर्त्याशी कृतज्ञता व्यक्त करा. प्रदेश आहे उत्कृष्ट व स्वच्छ आणि क्षमा करणारा पालनकर्ता आहे."
(पवित्र कुरआन- सूरतुस्सबा : १५)

परंतु त्यांनी या उपदेश व सदिच्छेला मानण्यास नकार दिला व आपल्या विलासात व ऐश्वर्यात निमग्न राहिले. परिणाम असा झाला की शेतीच्या प्राप्तीसाठी त्यांनी जे बंधारे बांधले होते ते पुराने फुटून गेले व आर्थिकदृष्ट्या नष्ट झाले. त्यांचा हा विनाश दैव व योगायोगामुळे नव्हता तर अल्लाहची अवज्ञा आणि त्याच्या देणग्यांशी कृतज्ञतेचा परिणाम होता. म्हणूनच पवित्र कुरआनने म्हटले आहे,

"निस्संदेह यात त्यांच्यासाठी (बोधप्रद) निशाण्या आहेत, जो संयम बाळगणारा आणि कृतज्ञता व्यक्त करणारा आहे." (पवित्र कुरआन- सूरतुस्सबा : १९)

ही घटना या गोष्टीचे प्रमाण होय की संयम व कृतज्ञतेचा मार्गच यशाचा मार्ग आहे. जेव्हा त्रास झाल्यास मनुष्य रडतो व आक्रोश करू लागतो आणि ऐश्वर्य व सुखावर कृतघ्नतेचा व्यवहार अवलंबितो तेव्हा येथूनच त्याच्या अपयशाचा प्रारंभ होतो.

'सूरा-ए-फजर'मध्ये काही अशाच राष्ट्रांचे वर्णन केले गेले आहे, जी आपल्या काळातील अत्यंत प्रगत राष्ट्रे होती आणि आधिभौतिक श्रेष्ठत्व त्यांना अल्लाहच्या प्रकोपापासून वाचवू शकले नाही. त्यानंतर मक्केच्या धनपूजक आणि भांडवलदारांना उद्देशून सांगितले गेले,

"कदापि नव्हे. तुम्ही अनाथांचा आदर करीत नाही आणि दीन-दुबळ्यांना जेऊ घालण्यासाठी उत्तेजित करीत नाही आणि वारसाचा सर्व माल खाऊन टाकता आणि संपत्तीवर अत्यंत प्रेम करता." (पवित्र कुरआन- सूरतुल फजर : १९-२०)

यात त्या गोष्टीकडे इशारा आहे की त्या राष्ट्रांच्या विनाशाचे एक कारण असेसुद्धा होते की त्यांनी अनाथ, दरिद्री व गरजूंचे हक्क ओळखले नाही आणि धन-दौलतीच्या प्रेमात ते त्या जबाबदाऱ्या विसरून गेले, ज्या त्यांच्यावर आल्या होत्या आणि नीतिमत्तेच्या सर्व मर्यादा ओलांडून संपत्ती संचय करण्याचे त्यांनी आरंभिले. आता तुम्हीसुद्धा त्याच्याच पावलावर पाऊल ठेवून चालला आहात. म्हणून निसर्गनियमानुसार तुमचासुद्धा तोच शेवट होईल जसा शेवट पूर्वीच्या कृतघ्न राष्ट्रांचा झाला होता.

-: समाप्त :-